I J R S S I S, Vol. VII, Issue (1), January 2019 : 01- 06 ISSN 2347 – 8268

INTERN ATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No.659/13(N)
www.vmsindia.org

# ग्रामीण महिला सशक्तिकरणात स्वयं–सहायता गटाची भूमिका

**प्रा. चित्रा सतीश धोटे**
(गृहशास्त्र–विभाग) यशवंत महाविद्यालय, वर्धा

**प्रस्तावना :–**

भारताला स्वातंत्र्य मिळून ७० वर्षे पूर्ण झाली. परंतू समाज व्यवस्थेत सर्वच क्षेत्रात स्त्रियांना आजही आर्थिक बाबतीत दुय्यम दर्जा दिला जातो. पुरूष प्रधान संस्कृतीमुळे विशेषत: ग्रामीण महिला " चूल आणि मूल " सांभाळून आपल्या कुटूंबासाठी आयुष्यभर काबाडकष्ट करते. स्त्रिया ह्य आर्थिकदृष्ट्य परावलंबी दिसून येतात. कारण कुटूंबाची आर्थिक जबाबदारी ही पुरूषांचीच होती. आजही ती २५ टक्के आहेच. परंतू वर्तमानकाळात व्यक्तीचा सामाजिक दर्जा निश्चित करतांना अर्थाला विशेष महत्व प्राप्त झाले. त्यामुळे महिलांना मग ती ग्रामीण असो की शहरी असो, आर्थिकदृष्टा स्वावलंबी बनवून तिच्या गुणांना वाव देण्यासाठी एक नवे माध्यम म्हणून "स्वयंसहायता गटाची" निर्मिती झाली या गटाला " स्वयंसहायता समूह " , बचतगट ", " शेजारगट " , तसेच "सेल्फ हेल्प ग्रुप " असेही म्हणतात.

समाजातील महिलांना मानाचे स्थान प्राप्त करून देण्यासाठी भारत आणि बांगलादेशांसारख्या राष्ट्रांनी स्वयंसहायता गटाच्या माध्यमातून अतिशय महत्वाचे पाऊल उचलल्यामूळे विशेषत: ग्रामीण व मागासलेल्या तसेच कमी उत्पन्न असणाऱ्या कुटूंबातील महिलांना ताठ मानेने समाजामध्ये राहण्याची व जीवन जगण्याची सुवर्णसंधी या गटाने प्राप्त करून दिलेली आहे.

**महिला सशक्तिकरण :–**

अर्थ – सक्षम होणे म्हणजे आर्थिक, समाजिक, राजकिय व शैक्षणिक दृष्ट्या सशक्त होणे होय. अर्थात महिलांना स्वावलंबी बनविणे म्हणजे सामाजिक दृष्टीकोनातून स्त्रियांवर अन्याय सूरू आहे. तेव्हा याची भरपाई करणे म्हणजे सशक्तिकरण होय. कायदेविषयक नैतिक अधिकार देणे म्हणजे सशक्तिकरण होय. अर्थात महिला सशक्तिकरणात महिलांचे संघटन हे अत्यंत महत्वाची भुमिका बजावते. स्वत:च्या कष्टातून काही बचत करणे, त्यातून अडीअडचणीत ऐकमेकींना आर्थिक मदत करणे, या सर्व प्रक्रियेतून महिलांना स्वत:च्या अस्तित्वाची व स्व–त्वाची जाणीव होते. त्याचबरोबर कुटूंब व गाव विकासाचाही त्या विचार करू लागतात. म्हणूनच एकंदरीत महिला सशक्तिकरणाच्या प्रक्रियेत स्वयंसहाय्यता गटाची भूमिका महत्वाची ठरते.

**स्वयंसहायता गट :–**

जगामध्ये स्वयंसहायता बचत गटाची चळवळ बचत गट, समूह गट, महिला बचत गट या वेगवेगळया संकल्पनेत साकार होत असल्याचे दिसून येते. या संकल्पनेच्या मूळात सक्षमीकरण हाच मुख्य उद्देश असल्याचा दिसून येतो. स्वयंसहायता बचत गटाची चळवळ सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक दृष्ट्य महत्त्वाची आहे. स्वयंसहायता गट ग्रामीण जीवनाला सुसंस्कृतपणाचा आकार देण्याचा प्रयत्न करते. समाजातील महिला या उपेक्षित घटकाच्या जीवनाला अर्थपूर्णता प्राप्त करून देण्याचा प्रयत्न आहे.

भारतामध्ये स्वातंत्र्यानंतर १९५१ पासून गरीबी निर्मुलनासाठी तसेच ग्रामीण महिला सशक्तिकरणासाठी अनेक योजना राबविल्या गेल्या. परंतू या योजनांचे मूल्यमापन केल्यानंतर यात अपेक्षित यश न मिळाल्यामूळे या सर्व योजनांचे एकत्रिकरण करून १ एप्रिल १९९९ पासून "स्वर्णजयंती ग्रामरोजगार योजना" अंतर्गत स्वयंसहायता गटांना प्रोत्साहन देण्यास सुरूवात झाली. आर्थिकदृष्ट्य कमकुवत गटातील लघू व्यावसायिकांसाठी कर्जपूरवठा होण्याचे हे एक साधन आहे. एकत्रित रित्या तयार असलेले गट त्या गटांनी केलेली बचत; गटांतर्गत तारणासहित कर्जपूरवठा वस्तूरूप तारणाऐवजी सामाजिक व समूहांचे तारण, महिलांचे असंख्य बचतगट हे महिलांच्या सक्षमीकरणाचे, गरिबीविरूदध लढ्याचे आणि सावकारी पाशातून मुक्ततेचे एक प्रभावी माध्यम आहे. पण स्वयंसहायता गट ही कोणतीही शासकीय योजना नसून महिलांना संघटीत करण्यासाठी त्यांना विकासात्मक स्वरूपाचे शिक्षण देण्यासाठीचे एक माध्यम आहे.

स्वयंसहायता या शब्दाच्या प्रत्येक अक्षरापासून त्याच्या कार्यकक्षाबाबत पुढीलप्रमाणे अर्थबोध होतो.

स्व – स्वत:च्या बचतीवर सूरू केलेला
य – यातना दूर करणारा
स – सर्वानूमते निर्णय घेतले जाणारा
हा – हाकेला मदत करणारा
य – यश मिळवून देणारा
ता – ताकद वाढविणारा

**स्वयंसहायता गटाची उद्दिष्ट्ये :–**

गरीब, दारिद्र्य रेषेखालील व वंचित घटकातील लोकांची पिळवणूक थांबावी. व त्यांना समाजात आत्मविश्वासाने जगता यावे, या उद्देशाने ही स्वयंसहायता गटाची चळवळ दिसून येते. याची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहे.

- सावकारांच्या पाशात अडकावे लागू नये. व प्रत्येक माणसाला बचतीची सवय लागावी.
- सदस्यांनी दैनंदिन स्वरूपात काही बचत करायची व अडीअडचीणींना या एकत्रित बचतीतून कर्ज घ्यायचे.
- स्वयंसहायता बचत गटातील महिलांचे मानसिक व वैचारिक परिवर्तन घडवून आणून त्यांना स्वबळावर उभे राहण्यास मदत करणे.
- वेळेप्रसंगी सहज उपलब्ध होणारी आपल्याच पैशातून मिळाणारी मदत.
- महिलांना संघटित करून त्यांना आर्थिकदृष्टया सशक्त व सबल बनविणे.

स्वयंसहायता गटाची भूमिका :–

स्वयंसहायता बचत गटाची चळवळ सामाजिकदृष्ट्य, राजकियदृष्ट्य, आर्थिकदृष्ट्य, सांस्कृतिकदृष्ट्य महत्वाची आहे.

ग्रामीण महिला सशक्तिकरणात स्वंय सहाय्यता गटाची भूमिका पुढिलप्रमाणे –

1. **राष्ट्रांचा विकास** :–
   कोणत्याही राष्ट्राला विकसनशीलतेतून विकसीत राष्ट्र होण्यासाठी वाटचाल करण्याकरीता एक आदर्श, मजबूत आणि सर्वसमावेशक प्रणालीची आवश्यकता असते. ही गरज स्वयंसहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून पूर्ण करता येते. जेणेकरून राष्ट्रांचा सर्वांगीण विकास साधण्यास मदत होते.
2. **उत्पन्नात वृद्धी** :–
   स्वयंसहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून अनेक उद्योग , व्यवसाय नव्याने सुरू करता येतात. त्यातूनच रोजगारनिर्मिती होऊन सदस्यांना पर्यायाने कुटूंबांना उत्पन्न प्राप्त होऊ शकते. त्यामुळे राष्ट्राच्या उत्पन्नात वृद्धी होण्यास स्वयंसहाय्यता बचत गटाची भूमिका महत्वपूर्ण ठरू शकते.
3. **ग्रामीण भागाचा विकास** :–
   स्वयंसहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून ग्रामीण भागात अनेक उपक्रम सुरू करता येते त्यामूळे स्थानिक रोजगार प्राप्त होऊन शहरी भागाकडील व्याप व तणाव कमी होऊन ग्रामीण भागाचा पर्यायाने ग्रामीण महिलांचा विकास होतो.
4. **कृषी उत्पादनात वाढ** :–
   कृषी उत्पादनासाठी आवश्यक भांडवल स्वयंसहायता बचत गटातून वेळेत व लवकर उपलब्ध होण्यास मदत होऊ शकते, त्यामूळे कृषी उत्पादन वाढून अन्नधान्याबाबत स्वयंपूर्णता होऊ शकते.
5. **मक्तेदारीस आळा** :–
   देशातील मोठे उद्योजक, व्यापारीवर्ग उत्पादनात व वितरणात स्वत:ची मक्तेदारी निर्माण करतात. परंतू स्वयंसहायता बचत गट उत्पादनात व वितरणात विविधता असल्यामुळे मक्तेदारीला आळा घालू शकतात, तसेच सामाजिक व आर्थिक शोषण कमी करता येऊ शकते.
6. **सामाजिक विकास** :–
   स्वयंसहायता बचत गटातून व्यक्ती विकास व सामाजिक विकास साधला जातो. त्यामुळे सामाजिक मुल्याची जपणूक स्वयंसहायता बचत गटातुन होते.
   वरील मुद्यांवरून स्वयंसहायता बचत गटाची भूमिका अतिशय महत्वपुर्ण आहे. त्यामुळे ग्रामिण व शहरी भागातील महिला ह्या आर्थिक बाबतीत स्वावंलबी होत आहेत.

**स्वयंसहायता गटाचे महत्व** :–

- ❖ बचत गटात सहभाग घेतल्यामूळे बचतीची सवय लागली.
- ❖ इतरांमध्ये मिसळण्याची, त्यांच्या अडचणी जाणून घेण्याची वृत्ती निर्माण झाली.
- ❖ सहकार्याची भावना वाढीस लागली.
- ❖ आत्मविश्वास वाढला.
- ❖ आर्थिक सक्षमीकरण झाले.
- ❖ एकोप्याची भावना वाढीस लागली.
- ❖ महिलांना प्रोत्साहन मिळाले. त्यांचा उत्साह वाढला.
- ❖ महिला आत्मनिर्भर बनल्या.
- ❖ स्वकर्तृत्वावर ठामपणे स्वत:च्या पायावर उभ्या राहू शकल्या.
- ❖ सामाजिक व आर्थिक शोषण कमी झाले.

**सारांश व निष्कर्ष** :–

महिलांच्या सशक्तिकरणात स्वयंसहायता गटाचे योगदान अतिशय महत्वपूर्ण आहे. कारण ग्रामीण महिला या गटामूळे संघटित होवून वेगवेगळे छोट–मोठे उद्योग सुरू करीत आहेत. उदा. :– पापड उद्योग, अगरबत्ती तयार करणे, बेकरी उद्योग, दूध उत्पादन, दुग्धजन्य पदार्थ निर्मिती, हळद प्रक्रिया उद्योग, आवळा प्रक्रिया उद्योग, खाणावळ चालविणे, शिवणकाम करणे, कागदी डिश तयार करणे, शेवया तयार करणे यासारखे अनेक उद्योग त्यामुळे त्यांच्या रोजगार , स्वयंरोजगाराच्या संधीमध्ये वाढ होवून महिला उद्योजकांचे प्रमाण वाढलेले दिसून येते. महिलांच्या बचत करण्याच्या वृत्तीमूळे उत्पन्नात वाढ, जागरूकता, आत्मविश्वास इ.त वाढ होवून बचतीतून स्वावलंबन व स्वावलंबनातून सशक्तिकरणाची प्रक्रिया मोठया प्रमाणात होत असल्याचे दिसून येते.

‘ खऱ्या अर्थाने महिला शिक्षित व सक्षम झाल्यास ती स्वत:चा, सोबतच कुटूंबाचा, समाजाचा, गावाचा पर्यायाने देशाचा विकास घडवून आणते. ’

**संदर्भग्रंथसूची** :–


1. स्वयंसहायता समूह कार्यक्रम – डॉ.ल.जा. शिरवाडकर
2. योजना मासिक – जानेवारी मार्च – २००८
3. महिला सक्षमीकरण व आर्थिक विकास–डॉ. प्राची देशपांडे
4. ग्रामीण महिला सशक्तीकरण– कुरूक्षेत्र मार्च –२००८
5. महिला सशक्तिकरण – विरेंद्रसिंह यादव
6. बचतगटांसाठी स्वयंरोजगाराचे ५१ महामार्ग – एस. बी. पवार
7. वेबसाईट – ूंल्हतजण्पेतरण्दमज


❖❖❖❖